बातमीपत्र

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर एन-१२ सेक्टर सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने पदे भरती बाबत.

१. सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने खालील अशासकीय पदे २३ नोव्हेंबर २०२६ रोजी भरावयाची आहेत. माजी सैनिक व किमान ०४ वर्षे कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य :-

अ. क्र.	पदनाम	पद संख्या	पात्रता	कर्तव्य
१.	लिपीक-नि-टंकलेखक गट-क	०१	माजी सैनिक व इतर नागरिक	कोणत्याही शाखेचा पदविधर माजी सैनिक व इतर नागरिक तसेच कार्यालयीन कामाचा तसेच उत्तम संगणक हाताळण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य. त्याअनूषंगाने पदाची कर्तव्य व जबाबदारी खालीलप्रमाणे आहेत. अ. मराठी व इग्रजी टायपिंग करणे. आ. संस्थेत येणारे पालक व विद्यार्थी संस्थेच्या लेखी परीक्षेची माहिती देणे. इ. छात्राकडून घेण्यात आलेल्या शेक्षणिक दस्तावेज व शुल्क यांच्या नोंदी व जतन करून ठेवणे. ई. संस्थेच्या लेखी परिक्षा संबधीत इतर कामे करणे. ए. संचालकांनी व अधीक्षकांनी सांगितलेली इतर कामे.
२.	वाहनचालक , गट-क	०१	माजी सैनिक किंवा इतर नागरिक	अ. वाहनचालकाचे सर्व कामे करणे, तसेच वाहनाची देखभाल करणे व वाहनाची दुरूस्ती करून घेणे. आ. तसेच विविध प्रकारची कार्यालयीन कामे करणे. इ. छात्रांच्या प्रशिक्षणाशी निगडीत कामे करणे. ई. संचालकांनी व अधीक्षकांनी सांगितलेली इतर कामे.
३.	सुतार, गट-क	०१	माजी सैनिक किंवा इतर नागरिक.	अ. संस्थेतील सर्व प्रकारच्या लाकडी व इतर सामानाची दुरूस्ती करणे. आ. छात्रांच्या शारिरीक कवायतीसाठी लागणारे साहित्य व अडथळे तयार / दुरूस्त करणे. इ. संचालकांनी व अधीक्षकांनी सांगितलेली इतर कामे.
४.	स्वयंपाकी, गट-ड	०१	माजी सैनिक किंवा इतर नागरिक.	अ. छात्रांना त्यांच्या वेळपत्रकाप्रमाणे दुध चहा नाष्टा, दुपारचे भोजन, सायंकाळचा चहा व रात्रीचे भोजन, दिलेल्या भोजन सुची नुसार तयार करणे. आ. स्वयंपाक गृहाची स्वच्छता राखणे. इ. संचालकांनी व अधीक्षकांनी सांगितलेली इतर कामे.
५.	सफाईगार, गट-ड	०१	माजी सैनिक किंवा इतर नागरिक.	अ. संस्थचे मैदाने, कार्यालय, भोजनगृह, स्वयंपाकगृह, विद्यार्थ्याचे वसतीगृह, बाथरूम, शौचालय, सांडपाणी वाहिनीची साफ सफाई व स्वच्छ करणे. आ. संचालकांनी व अधीक्षकांनी सांगितलेली इतर कामे.
६.	मसालची, गट-ड	०१	माजी सैनिक किंवा इतर नागरिक.	अ. स्वयंपाक्यास भोजन तयार करण्यास मदत करणे. आ. भोजनासाठी व स्वयंपाकासाठी लागणारी भांडी साफ करणे. इ. स्वयपांकगृहात स्वच्छता ठेवणे. ई. भोजनालयात छात्रासाठी जेवन लावणे व वाटप करणे. ए. संचालकांनी व अधीक्षकांनी सांगितलेली इतर कामे.

२. तरी महाराष्ट्र राज्यातील माजी सैनिक व इतर पात्र नागरी उमेदवारांना कळविण्यात येते की, वरील पदाच्या व पात्रतेच्या संबंधित कागदपत्रासहित सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, एन-१२, सेक्टर-सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे सोमवार दिनांक **२३ नोव्हेंबर २०२६** रोजी सकाळी १०.०० वाजता मुलाखतीसाठी उपस्थित रहावे. संपर्कासाठी मोबाईल क्रमांक - ९४२३२५३६६८. अधिक माहितीसाठी संस्थेचे संकेतस्थळ www.spicsn.com यावर पाहावे.

(मकरंद देशमुख)
कर्नल (निवृत्त)
संचालक

Services Preparatory Institute
Govt Maha
Ch. Sambhajinagar